**नि.दि.मु.क्र.१३/२०१७ मधील आय.ए. क्र. ८/२०२१ ते १०/२०२१ (निशाणी ७९ ते ८१) वरील संयुक्तीक आदेश**

निशाणी ७९ कडील अर्ज प्रतिवादी क्र. १३ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफीसाठी, निशाणी ८० कडील अर्ज प्रतिवादी क्र. १३ विरुध्द दावा अवसान पावला तो आदेश रद्द करण्यासाठी व निशाणी ८१ कडील अर्ज प्रतिवादी क्र. १३ चे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी यासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

**०२.** वादींचे असे म्हणणे आहे की प्रतिवादी क्र. १३ हा मयत झालेला आहे. प्रतिवादी क्र. १३ चे वारस मुदतीत दाखल न केल्याने प्रतिवादी क्र. १३ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. प्रतिवादी क्र. १३ हे मयत झालेले असल्याबाबत न्यायालयाचे समन्स न बजावता परत आल्याने समजले. प्रतिवादी क्र. १३ हे कायमस्वरुपी कोल्हापूर येथे राहत असल्याने व त्याठिकाणीच मयत झाल्याने त्यांच्या वारसांबाबत तात्काळ माहिती उपलब्ध होऊ शकलेली नव्हती. मात्र वादींनी त्यांचे वारसांबाबत अधिक चौकशी करुन वारसांची माहिती मिळविलेली आहे. त्यामुळे त्यांना अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला असल्याचे व प्रतिवादी क्र. १३ विरुध्द दावा अवसान पावल्याचे वादींचे म्हणणे आहे. प्रतिवादी क्र. १३ चे कायदेशीर प्रतिनिधी हे नोटीसची बजावणी होवूनदेखील हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द प्रस्तुत अर्ज एकतर्फा चालविण्यात आलेले आहेत. प्रतिवादी क्र. १ हिने तिचे म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतलेला आहे. तिचे असे म्हणणे आहे की अर्ज खोटा व खोडसाळ आहे. वारस अभिलेखावर आणण्यास अक्षम्य दिरंगाई केलेली आहे. सबब, सदरचे अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावेत अशी तिने विनंती केली.

**०३.** दोन्ही बाजूच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १३ हा मयत झाला या तथ्याबाबत प्रतिवादी क्र. १ हिने कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. प्रतिवादी क्र. १३ च्या मृत्यूनंतर त्याच्या कायदेशीर

प्रतिनिधींविरुध्द दावा पुढे चालविण्याचा अधिकार टिकून राहत आहे. अर्जात नमूद केलेले कारण हे शपथेवर नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जातील कारण संयुक्तीक आहे. सबब, तिनही अर्ज मंजूर करण्यात येतात.

**०४.** प्रतिवादी क्र. १३ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो. तसेच प्रतिवादी क्र. १३ विरुध्द दावा अवसान पावल्याचा आदेश रद्द करण्यात येतो. वादींना मयत प्रतिवादी क्र. १३ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते. त्याअनुषंगे पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी दावा दुरुस्ती करण्यात यावी व दुरुस्त दाव्याची प्रत सादर करण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2021.03.20 18:33:46 +0530

दि. २०/०३/२०२१ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER